DISTRICT AND SESSIONS COURT, WARDHA

Civil Lines, Sewagram Road, Wardha 442001

Web– https://wardha.dcourts.gov.in Email – mahwardc@mhstate.nic.in

जा.क्र. ३२५७/स.अ./संगणक/निविदा/२०२५ दिनांक १४/०७/२०२५

दरपत्रक / निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील मुख्यालयी कार्यरत न्यायालये व आस्थापनेकरीता पुढील नमुद प्रिंटरसाठी नविन कॉम्पीटेबल टोनर कार्टेजबाबत स्थानिक पुरवठादाराकडून दरपत्रक / निविदा मागविण्यात येत आहे.

Sr. No.	Name of Article
1	Canon LBP246DW Compatible Toner Cartridge

करिता सदर जाहिरात प्रसिध्द झाल्यापासुन दिनांक २१ जुलै, २०२५ चे कार्यालयीन वेळेपुर्वी पर्यंत **खालील विवरणाप्रमाणे व नमुद अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रक** जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे बंद लिफाफ्यामध्ये सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त होणा–या मोहरबंद निविदा/दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही, याबाबत नोंद घेण्यात यावी.

अटी व शर्ती :–

१. मोहरबंद/सीलबंद लखोटयावर "**Canon LBP246dw लेझर प्रिंटरसाठी Compatiable Toner Cartridge साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक**" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा व ती खालील नमुन्यातच जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे सादर करावीत.

Sr. No.	Name of Article	Qty	Rate	Applicable GST/CGST Rate	Total Amount (4 +5)
1	2	3	4	5	6
1	Canon LBP246DW Compatible Toner Cartridge				

२. दरपत्रकातील/निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहीत तसेच बसवून देणेसह आणि पडताळणीसह नमुद करावे. सदरील दर हे दरपत्रक स्विकारल्यावर १ वर्षासाठी अस्तित्वात राहतील.

३. प्रिंटर टोनर कार्टेजची मागणी केल्यानंतर पुरावठाधारकाने पुर्वी जे टोनर प्रिंटरमध्ये बसविले होते ते जुने टोनर पुरवठाधारक परत नेऊ शकतील त्यामुळे दरपत्रकात दर नमुद करतांना सदरील बाबींचा विचार करुनच कमीत कमी दर आकारुन दरपत्रक/निविदा सादर करावीत.

४. ज्यावेळेस प्रिंटर टोनर कार्टेजची मागणी करण्यात येईल त्यावेळेस सील असलेले प्रिंटर टोनर कार्टेजच स्विकारण्यात येतील. रिफीलींग केलेले कार्टेज स्विकारण्यात येणार नाही.

५. दर करार केल्यानंतर प्रिंटर टोनर कार्टेज उपलब्ध करुन देण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेवर/पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच सदर कालावधीत पुरवठादारास सदर साहित्याबाबत कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.

६. ज्या न्यायालया/विभागामध्ये प्रिंटर बसविण्यात आलेले आहेत त्या ठिकाणी Service Call Report तयार करुन त्यावर संबंधीत न्यायालय/विभागातील कर्मचा–याची स्वाक्षरी घेवुन त्याची एक प्रत संबंधित जिल्हा न्यायालय येथे देण्यात यावी व एक प्रत पुरवठाधारक यांनी हस्तगत करावी. जिल्हा न्यायालयात देयक सादर करतांना याबाबतचा तपशील देयका सोबत सादर करावा लागेल.

७. सदर करारपोटी होणा–या रक्कमेची अदायगी एका वर्षात चार हप्तयात म्हणजेच तिमाही स्वरुपात अदा करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब होत असल्यास विलंब आकार, व्याज किंवा इतर अतिरिकत् शुल्क देय राहणार नाही.

८. प्रिंटरचे बसविण्यात येणारे कॉम्पीटेबल टोनर कार्टेज हे दर्जेदार व उच्च प्रतीचे राहील. सदरील टोनरमध्ये समाविष्ट असलेली शाई/पावडर हे उच्च प्रतीची असणे आवश्यक आहे.

९. कोणतेही दरपत्रके/निविदा स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा सर्वच दरपत्रके/ निविदा नाकरण्याचा हक्क जिल्हा न्यायालय, वर्धा हे राखून ठेवीत आहे.

१०. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

११. टोनरची मागणी नोंदविल्यानंतर २४ तासाच्या आत पुरावठाधारकास मुख्यालयातील न्यायालये/विभागाचे ठिकाणी टोनर कार्टेज उपलब्ध करुन द्यावे लागेल. त्याकरीता कोणताही भत्ता किंवा वाहन जिल्हा न्यायालयाद्वारे पुरविण्यात येणार नाही.

१२. मुख्यालयातील न्यायालय/विभाग निहाय प्रिंटरची यादी यासोबत सलंग्न करण्यात येत आहे.

१३. बदलण्यात आलेल्या टोनर कार्टेजमध्ये दोष आढळून आल्यास/काही दोष उत्पन्न झाल्यास तो तात्काळ बदलून द्यावा लागेल.

१४. सदरील करार सुचनेचे पालन न केल्यास कोणत्याही टप्यावर, कोणत्याही क्षणी अथवा करार सुंपष्टात आणण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाने राखून ठेवले आहे.

१५. वार्षिक देखभाल/दुरुस्ती करारावर राज्य व केंद्र सरकाचे आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे करार जसे की, GST, Income Tax etc. दरपत्रक मंजूर झालेल्या संबंधित व्यावसायिकाला/सेवापुरवठादाराला सोसावे लागतील या कार्यालयाकडून सदर प्रकारचे कोणतेही कर संबंधितास अदा करण्यात येणार नाहीत.

१६. टोनरचा पुरवठा केल्यानंतर पेपरवरील प्रिंटींग पुसल्या जात असल्याचे निर्देशनास आल्यास ते प्रिंटर टोनर कार्टेज स्विकारण्यात येणार नाहीत व ते बदलून देण्याची सर्वस्वी जबाबदारी टोनर पुरवठाधारकावर राहील तसेच पुन्हा तोच टोनर पुरवठा केल्यास त्याचा मोबदला देण्यात येणार नाही.

१७. सर्व टोनरमध्ये शाई/पावडर हे १०० टक्के पूर्ण क्षमतेने भरलेले असावेत टोनरचे प्रमाण कमी भरल्याचे आढळून आल्यास किंवा टोनर खराब निघाल्यास ते टोनर परत नवीन बदलवुन द्यावे लागेल बदलविण्यात आलेल्या टोनरचा वेगळा मोबदला दिला जाणार नाही.

१८. टोनर पुरवठा करण्याबाबत तक्रारी आल्यास मंजुर करण्यात आलेले कंत्राट कोणतीही नोटीस न देता तात्काळ रद्द करण्यात येईल.

१९. करारानुसार काम न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास कोणत्याही टप्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता आपला वार्षिक विषयांकित करार संपूर्णतः रद्द करण्याचे अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा यांना राहतील.

२०. दरपत्रक/निविदा लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत.

आस्थापना व दुकाने अधिनियम लायसन्स प्रमाणपत्राची प्रत, पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

२१. सदरची जाहिरात जिल्हा न्यायालय, वर्धा संकेतस्थळावर (https://wardha.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

२२. निविदाधारकांनी दरपत्रक/निविदा जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथे दिनांक २१/०७/२०२५ रोजीपर्यंत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

आदेशावरुन

प्र. प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा

दिनांक :- १४/०७/२०२५

प्रतिलीपी :-

१. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस फलकावर तसेच संकेत स्थळावर प्रकाशीत करण्याकरीता

२. तहसिल कार्यालय, नगर परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस फलकावर प्रकाशीत करणेकरीता